# दहावीत ९० टक्के मिळालेल्या अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना दोन लाख

**मुंबई :** अनुसूचित जातीतील दहावीच्या परीक्षेत ९० टक्के किंवा त्याहून अधिक गुण मिळविलेल्या आर्थिक दुर्बल घटकांतील

## धनंजय मुंडे यांची माहिती

विद्यार्थ्यांना व्यावसायिक उच्च शिक्षणाच्या पूर्वतयारीसाठी ११ वी व १२ वी या दोन वर्षांत प्रत्येकी १ लाख याप्रमाणे एकूण २ लाख रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने बार्टीमार्फत हे अनुदान दिले जाईल, अशी माहिती राज्याचे सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांनी दिली. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा कमी असणे गरजेचे आहे. तसेच, शासकीय सेवेत नोकरीला असणाऱ्या पालकांच्या पाल्यांना ही योजना लागू असणार नाही. उत्पन्नाचा व जातीचा प्रमाणित दाखला देणे आवश्यक आहे. या योजनेमधील लाभार्थी संख्या अमर्यादित असल्याचे बार्टीचे महासंचालक धम्मज्योती गजभिये यांनी दिली आहे.